सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
महाज्योती
ज्ञानदीप समतेचा
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्र. ०७१२-२८७०१२०/२१ CIN - U85300PN2019NPL187405 ई-मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र.महाज्योती/नागपूर/आस्था/११६/२०२५-२६ दिनांक :- २३/०१/२०२६

# परिपत्रक

**विषय :- महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) परीक्षा पूर्व प्रशिक्षण २०२५-२६ करिता निवड झालेल्या विस्तारित यादीतील विद्यार्थांची निवड यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत.**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाज्योती संस्थेमार्फत राबिण्यात येणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता पात्र विद्यार्थांची निवड यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर दि.१५/१२/२०२५ व प्रतिक्षा यादी दि.१४/०१/२०२६ रोजी प्रसिध्द करून निवड झालेल्या विद्यार्थांना संबंधित प्रशिक्षण संस्थेत रुजू होण्याकरिता दि.१०/०१/२०२६ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

तथापि सदर परीक्षापूर्व प्रशिक्षणाकरिता जास्तीत जास्त विद्यार्थांना लाभ मिळावा या हेतूने अनेक विद्यार्थांनी महाज्योती कार्यालयात विद्यार्थी संख्या वाढवून देण्याकरिता विंनती केले असता दि.२०/०१/२०२६ रोजी झालेल्या महाज्योती संस्थेच्या मा.संचालक मंडळाच्या बैठकीत महाज्योती संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) परीक्षापूर्व प्रशिक्षणाकरिता विद्यार्थी संख्या वाढविण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर परीक्षापूर्व प्रशिक्षणाकरिता मंजूर वाढीव विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुढील प्रतिक्षा यादीतील विद्यार्थांची निवड करून पात्र विद्यार्थांची प्रवर्ग निहाय व समांतर आरक्षणानुसार विस्तारित यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. **निवड झालेल्या सर्व विद्यार्थांना प्रशिक्षण संस्थेत रुजू होण्याकरिता सूचना महाज्योतीच्या संकेतस्थळावर स्वतंत्र परिपत्रकाद्वारे निर्गमित करून देण्यात येईल.** सर्व संबंधित विद्यार्थांनी याची नोंद घ्यावी.

**स्वा**
**(मिलिंद नारिंगे)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर**